# NewsleTERRE

27 FEBRUARY 2013, ISSUE


# पर्यावरण रक्षणातील हात : डॉ. राजेंद्र शेंडे



जागतिक हवामान बदल, वातावरणातील ओझोनच्या थराला पडलेले भोक यावर जगभरात अनेक व्यासपीठांवर चर्चा सुरू आहे. नुसत्या चर्चेपेक्षा त्यापुढे जाऊन विकसनशील देशांना पर्यावरण रक्षणासाठी काही कृती करण्यास भाग पाडण्यामध्ये डॉ. राजेंद्र शेंडे यांचा मोठा हातभार आहे.



सातारा जिल्ह्यातील रहिमतपूरसारख्या खेडेगावातून आलेल्या आणि संपूर्ण शिक्षण मराठी माध्यमातून झालेल्या शेंडे यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रमाच्या माध्यमातून जगभर आपला ठसा उमटविला. नोबेल पारितोषिक मिळविलेल्या राजेंद्र पचौरींच्या आयपीसीसी या संस्थेच्या अनेक सहकाऱ्यांपैकी शेंडे हेही महत्वाचे सहकारी होते.

युनेपच्या ओझोन कृती गटाचे प्रमुख राजेंद्र शेंडे यांचे पर्यावरण रक्षणासाठीचे योगदान आज केवळ भारतातच नाही तर जगभरात गणले गेले आहे. त्यांनी तयार केलेल्या सौर उर्जेवर चालणाऱ्या प्रदूषणरहित शीतपेटीची दखल तत्कालिन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी घेतली होती. जगातील १४६ विकसनशील देशांना पर्यावरण रक्षणासाठी सज्ज करण्याची जबाबदारी त्यांची आहे. मॉंटियल करारानुसार ओझोनच्या थराला वाचविण्याचे काम करण्यासाठी पर्यायी तंत्रज्ञानाची ओळख करुन देणे आणि ते वापण्यासाठी उद्युक्त करणे हाही त्यांच्या कामाचा भाग. चर्चेबरोबरच कृतीवर भर देण्याचा आग्रह धरण्याबाबत शेंडे हे तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यावरणपूरक नाविन्यपूर्ण उत्पादने बनविणाऱ्यांना प्रोत्साहन देणे महत्वाचे मानतात. याच भूमिकेतून त्यांनी स्वतःच्या रहिमतपूर गावाचा कायापालट केला.

राजेंद्र शेंडे हे मुळचे रसायन अभियंता. मुंबईच्या आयआयटीतून त्यांनी अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली. काहीतरी वेगळे करण्याच्या उद्देशाने त्यांनी युनेपसारख्या संस्थेत मिळालेल्या संधीचा फायदा घेण्याचा वसा घेतला. १९९२ च्यापासून त्यांनी युनेपमध्ये विविध पदांवर काम केले आहे. हुशारीला ध्येयासक्ती व कामाची लगन याची जोड असेल तर काय होऊ शकते हे शेंडे यांच्या रुपाने पहावयास मिळते.

शेंडे यांचे प्राथमिक शिक्षण खटाव तालुक्यातील वडूज येथे झाले. माध्यमिक शिक्षण रहिमतपूरला झाले. अकरावीसाठी ते मुंबईच्या खार भागातील बीपीएम हायस्कूलमध्ये दाखल झाले. त्यांचे राम गणेश गडकरी पारितोषिक अवघ्या तीन गुणांनी हुकले. मात्र विज्ञान विषयाने त्यांना मोठा हात दिला. त्यामुळेच ते रुईया महाविद्यालयात शास्त्र शाखेकडे वळले. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते महाराष्ट्राच्या एस. एस. त्री. बोर्ड परिक्षेत २४ वे आले होते. नंतर त्यांनी मोठ्या प्रयत्नाने आयआयटीमध्ये प्रवेश घेतला.

रसायन उद्योग ते युनेपपर्यंतचा त्यांचा प्रवास वेगळा आहे. खेडेगावात वाढल्याने आणि बहुतांश मित्र शेतकरी असल्याने निसर्गाशी त्यांची जवळीक आहे. कुसुमाग्रज, ग्रेस, ना. धों. महानोर, बाबा आमटे यांच्या कविता हा त्यांच्या आवडीचा विषय. युनेपमध्ये असताना ते फ्रेंचही शिकले. भाषाप्रेम केवळ वाचनापुरते मर्यादित नसून, उत्सवापलीकडे जाऊन पाहिले पाहिजे असे त्यांचे मत आहे.

युनेपचे कार्य इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, अरेबिक आणि रशियन भाषेव्यतिरिक्त इतर भाषेतही पोहोचविण्यासाठी शेंडे यांनी कार्य केले. युनेपने तयार केलेली पुस्तके, इतर पुरक साहित्य, सी. डी. यांचे भाषांतर खासगी क्षेत्राच्या सहकार्याने केले. सध्या हे साहित्य मराठी, बंगाली आणि उर्दूत उपलब्ध करण्यात आले आहे.

**सिद्धार्थ केळकर**


२७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रजांचा वाढदिवस जागतिक मराठी दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. तेर पॉलीसी सेंटर ने म्हणूनच जागतिक स्तरावर पर्यावरण विषयक काम करणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींना हा अंक समर्पित केला आहे. आज पर्यावरणाचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. आपल्या आयुष्याचे ध्येय पर्यावरण संतुलन हे आहे असा संदेश देणारे व त्याच क्षेत्रात निरलसपणे कार्यरत असणारी ही मराठी माणसे. या सर्वांचेच काम आंतरराष्ट्रीय स्तरावर वाखाणले गेले आहे. प्रत्येकाची वेगळी विचारसरणी, वेगळे ज्ञान पण एकच तत्व. आज सर्वच क्षेत्रात मराठी माणसे आघाडीवर आहेत. तरीही यांच्यातले वेगळेपण आहे ते म्हणजे आपल्या मातीसाठी, आपल्या समाजासाठी, पर्यावरण बदल आपल्या पद्धतीने वाचवण्यासाठी कटी बद्ध आहेत. कुसुमाग्रजांच्याच भाषेत सांगायचे तर यांच्या कार्याला विश्रांती नाही, कुसुमाग्रजांच्या कवितेची हि ओंजळ या मराठी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या पर्यावरण तज्ज्ञांना आदरपूर्वक समर्पित...

**चला उभारा शुभ्र शिडे ती**
**गर्वाने वरती !**
**कथा या खुळ्या सागराला !**
**अनंत अमुची ध्येयासक्ती !**
**अनंत अन आशा !**
**किनारा तुला पामराला...**



**विनिता आपटे**

# जलतज्ज्ञ
## डॉ. माधवराव चितळे



डॉ. माधवराव चितळे

भारताच्या पाणीप्रश्नावर सातत्याने काम करणारे, जलसंपदेचे नियोजन आणि संशोधनात अग्रभागी असणारे एक वेगळे व्यक्तीमत्व म्हणून माधवराव चितळे यांच्याकडे पाहिले जाते.


महाराष्ट्राच्या सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरीची सुरुवात केल्यानंतर नंतर ते राज्याच्या पाणीपुरवठा आणि सिंचन खात्यात सामील झाले. त्यानंतर त्यांनी या खात्यातील सर्वोच्च अशा सचिवपदी त्यांची नियुक्ती झाली. केंद्रीय पातळीवर सचिव म्हणून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला. १९९३ साली त्यांना स्टॉकहोम येथील जागतिक जल पुरस्कार मिळाला. या पुरस्काराची रक्कम ४६ लाख रुपये इतकी होती. चितळे यांनी त्यानंतर १० ते १२ वर्षेजागतिक पातळीवर काम केले. जलअभियांत्रिकी अभियंता म्हणून माधवराव यांचे कार्य वादातीत आहे.

८ ऑगस्ट १९३४ रोजी यवतमाळला त्यांचा जन्म झाला. मात्र त्यांचे बालपण जळगावात गेले. त्याच ठिकाणी त्यांच्या आयुष्याची खऱ्या अर्थाने जडणघडण झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांच्यावर झालेल्या संस्कारानंतर त्यांनी मोठेपणी देशासाठी काही तरी करावयाचे ठरविले. शालांत परीक्षेनंतर १९५० रोजी त्यांनी पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. क्रिकेट, खो-खो आणि हुतूतू खेळामध्ये ते माहीर होते.

भारतात पाणी या प्रश्नावर सातत्याने कार्य करणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख. व्यूव्हरचनात्मक नियोजनकर्त्यांना जलस्त्रोतांची जाण देण्याची भूमिका बजावली. १९८० पासून राष्ट्रीय जलसंसाधन दिन साजरा करण्यामागे त्यांचीच प्रेरणा आहे. १९६१ मधील पानशेत परिस्थितीचे पुनर्वसन, कोयना भूकंपग्रस्त प्रकल्पाचे पुनर्नियोजन असो

(पान ३ वर)

# पर्यावरणाचा वारकरी
## डॉ. माधवराव गाडगीळ



डॉ. माधवराव गाडगीळ

माधवराव गाडगीळ जैव वैविध्य आणि पर्यावरण क्षेत्रातलं एक आगळंवेगळं नाव. या क्षेत्रात काम करताना विविध दैनिके, मासिकांमधून सातत्याने त्यांनी लिखाण केलं. पश्चिम घाट पर्यावरण संदर्भात त्यांच्या समितीने केलेल्या शिफारशींवरुन मतभेद होताना दिसत असले तरी त्यांचं या क्षेत्रातील महत्व वादातीत आहे. २४ मे १९४२ रोजी पुण्यात जन्मलेल्या माधवरावांनी पुण्यात प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण घेतले. अर्थतज्ज्ञ धनंजय गाडगीळ यांचे ते सुपूत्र. लहानपणापासून माधवराव हे हुशार विद्यार्थी म्हणून गणले गेले. पुण्यात त्याकाळी निघणाऱ्या सृष्टीज्ञान नावाच्या विज्ञान मासिकामुळे त्यांच्यात विज्ञानाची आवड निर्माण झाली. इरावती कर्वे, दिनकरराव कर्वे, अण्णासाहेब कर्वेहे त्यांचे शेजारी. १९५७ साली माधवरावांनी प्राणीमानसशास्त्रावर पहिला लेख लिहिला. दिनकर कर्वेयांनी त्यांना लिखाणास उद्युक्त केले. या कालावधीत त्यांनी विविध प्राण्यांवर लिखाण केले. १९५७ ते १९६१ या काळात म्हणजे वयाच्या २० वर्षापर्यंत त्यांचे अनेक लेख छापून आले होते. रशियन अर्थशास्त्रज्ञ वासिली लिओन्टिएफ एकदा त्यांच्या घरी आल्यानंतर १३ वर्षेवयाच्या माधवरावांनी त्यांची विचारले पुढे काय होणार आहे? त्यावेळी आपण जीवशास्त्रज्ञ होणार असल्याचे माधवरावांनी म्हटले होते. संख्याशास्त्रज्ञ डॉ. प्रशांतचंद्र महालनोबिस, पक्षीतज्ज्ञ सलीम अली, जे. बी. एस. हाल्डेन यांच्याशी त्यांना चर्चा करता आली. पुढे माधवरांनी हॉवर्ड विद्यापीठातून डॉक्टरेट मिळविली. त्या ठिकाणी काही काळ अध्ययनही केले. अनेक विद्यापीठातून त्यांनी मानद प्राध्यापक म्हणूनही काम केले आहे. बंगळुरुच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे प्राध्यापक म्हणून काम करताना त्यांनी आपला ठसा उमटविला. पर्यावरणाचे महत्व सगळ्यांना समजून सांगण्यासाठी त्यांनी पुस्तके, लेख लिहिले. गुढ निसर्गाची महती सर्वांना कळावी म्हणून त्यांनी मोठे प्रयत्न केले. वैद्यकशास्त्रामध्ये अभ्यास करुन ते डॉक्टर झाले असते मात्र त्यांनी पर्यावरणाचा अभ्यास करुन देशाच्या प्रगतीसाठी हातभार लावला. ज्या काळी इकॉलॉजी हा शब्द रुढ व्हावयाचा होता, त्या काळी अमेरिकेत जीवशास्त्र व संगणकशास्त्राचे शिक्षण घेऊन त्यांनी भारतात येत पर्यावरणावर काम करण्याचे ठरविले. कोळी, बेडूक यांच्यापासून ते वाघ हत्ती यांच्याबाबत त्यांनी अभ्यास केला. सर्वसामान्य लोकांना सोप्यात सोप्या भाषेत पर्यावरण कळेल यासाठी त्यांनी निबंध लिहिले. त्यांचे अनेक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी आतापर्यंत २१५ शोधनिबंध आणि ६ पुस्तके लिहिली आहेत. 'द फिशर्ड लँड, 'इकॉलॉजी अँड इक्विटी', 'डायव्हरसिटी', 'द कॉर्नरस्टोन ऑफ लाईफ', 'नर्चरिंग बायोडायव्हरसिटीः ॲन इंडियन अजेंडा', 'इकॉलॉजीकल जर्नीज, 'पिपल्स बायोडायव्हरसिटी रजिस्टर्सः ए मेथॉडॉलॉजी मॅन्युअल' ही पुस्तके गाजली. इंग्रजी आणि इतर भारतीय भाषांमध्ये ते सातत्याने लिहीत असतात. व्याघ्र प्रकल्प, भारतातील हत्तींची मोजदाद त्यांच्याच काळातला मोठा प्रकल्प होय. निसर्ग, पर्यावरण, जैव-वैविध्य या विषयांबद्दल आपल्या समाजात मोठी अनास्था असल्याचे त्यांना वाटते. शिकलेली माणसंच कशी चुकीच्या पद्धतीने वागतात याबद्दल त्यांना खंत आहे. २००२ मध्ये भारतीय जैववैविध्याच्या कायद्याच्या रचनेवरील समितीमध्ये ते होते. संशोधक, शिक्षक, अशासकीय संस्थेचे सदस्य त्याचप्रमाणे सरकारमध्ये महत्वाची भूमिका प्रभाव बजावणाऱ्या अनेकांनी त्यांनी मार्गदर्शन केलंय. ते अनेक संस्थांवर कार्यरत आहेत. अनेक प्रकल्पावर पर्यावरणविषयक सल्लागार म्हणून कर करताना ते एनसीईआरटीचे अध्यक्षही राहिले आहेत. पद्मश्री, पद्मभूषण, शांतीस्वरुप भटनागर, कर्नाटक सरकारचा राज्योत्सव पुरस्कारासह त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम घाट पर्यावरण संदर्भात समिती स्थापन झाली. या समितीने अनेक उपाय सुचविले आहेत.

**समीर इनामदार**

# वृक्षमित्र डॉ. मोहन धारिया



डॉ. मोहन धारिया

एक धुरंधर राजकारणी, नेता इतपतच मोहन धारिया यांची ओळख नाही. पर्यावरण क्षेऊत हिरीरीने काम करणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची महती आहे. वनराईचे संस्थापक म्हणून त्यांनी केलेले काम हे सर्वांना मार्गदर्शक आहे.

१४ फेब्रुवारी १९२५ रोजी जन्मलेल्या मोहन धारिया यांचे बालपण मुळातच कोकणात गेले. त्यामुळे सातत्याने त्यांना या क्षेर्अविषयी अधिक आवड आहे. मॅटीकनंतर त्यांनी पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्यानंतर त्यांनी विधी महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली. वयाच्या १७ व्या वर्षी राष्टीय आंदोलनात सहभाग घेतल्यानंतर मोहन धारिया यांनी मागे पाहिले नाही. कोणत्याही कार्यात झोकून देण्याची त्यांची वृत्तीच त्यांना पुढे घेऊन गेली. पुणे महापालिकेचे नगरसेवक,महाराष्ट काँग्रेस समितीचे सरचिटणीस, राज्यसभेचे सदस्य म्हणून त्यांनी वाखाणण्याजोगे काम केले. १९७१ ते ७५ या काळात ते नियोजन, गृह आणि शहर विकास खात्याचे राज्यमंत्री होते. या काळात त्यांनी त्यांनी अत्यंत धडाडीने काम पाहिले. नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष, सहकार चळवळ, बँकांचे राष्टीयीकरण या क्षेऊत त्यांच्या कामाची चुणूक पहावयास मिळाली.

याच काळात त्यांनी वनराईची स्थापना केली. आज या संस्थेचे नाव देशभर गाजते आहे. २५ लाखाहून अधिक वृक्षारोपण करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. गृहनिर्माण संस्था, शहर आणि गावांमध्ये जी काही हिरवळ दिसते आहे, ती केवळ वनराई या संस्थेने केलेल्या कार्यामुळेच. युवकांना प्रेरणा मिळावी म्हणून त्यांनी युवा शक्ती, हिमायलन ॲडव्हेंचर्स आणि रक्तदाता प्रतिष्ठानची स्थापना केली. २० हजाराहून अधिक बाटल्यांचे रक्त या संस्थेच्या माध्यमातून गोळा करण्यात आले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. पडीक जमीन सुपीक करण्यासाठी त्यांनी भारत सरकारला सुचविलेले उपाय आजही उपयोगी आहेत. आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक, राजस्थान, महाराष्ट या राज्यात पडीक असणारी जमीन उपयोगात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या कामाचा मोठ्या प्रमाणावर फायदा झाला.

डॉ. मोहन धारिया यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ३०० गावे कार्यरत आहेत. त्यांच्या या प्रयत्नाचे वैशिष्ट्य म्हणजे मुंबईच्या झोपडपट्टीमध्ये राहणारी ३० कुटुंबे आपल्या गावी पुन्हा रहावयास आली आहेत. स्वयंप्रेरणेने विकसित झालेली गावे येत्या काळात खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण होतील असा विश्वास डॉ. धारिया व्यक्त करतात. वनराई बांधच्या माध्यमातून त्यांनी पाण्याचे नियोजन केले. २००१ ते २००६ या कालावधीत त्यांनी २,४०,००० बांध बांधले. टँकरमुक्त महाराष्टासाठी त्यांचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

पडीक जमिनींचा विकास, टँकरमुक्त गावे, ए टू झेड वॉटरशेड डेव्हलपमेंट या प्रश्नावर त्यांनी त्यांचे काम वाखाणण्यागोगे आहे. नागरिकांना जागृत करण्यासाठी त्यांनी विविध लेख आणि पुस्तके लिहिली. 'सफर', 'बोल अनुभवाचे', फ्युम्स अँड द फायर, यही है जिंदगी, अफॉरेस्टेशन इन इंडिया, पॉप्युलेशन एक्सप्लोजन अँड इंडिया' ही त्यांची पुस्तके.त्यांच्या कार्याबद्दल वेगवेगळ्या पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. डॉ. ए. पी. जे. अब्दुलकलाम यांच्या हस्ते त्यांना पद्मविभूषण देऊन गौरविण्यात आले. डी. लिट, इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कार, यशवंतराव चव्हाण अवॉर्ड फॉर एक्सलन्स, राजीव गांधी पर्यावरण मित्र पुरस्कार,पुण्यभूषण पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, विकासरत्न पुरस्कार, रामशास्त्री प्रभुणे पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

**समीर इनामदार**


**(पान २ वरुन)** किंवा भातसा प्रकल्पाच्या कार्यान्वयानामागे त्यांची प्रमुख भूमिका राहिली आहे. पानशेत-खडकवासला धरणफुटीनंतर पुणेवासियांना पाणी मिळणे कठीण बनले असताना त्यांनी पावसाळ्यापूर्वी ताबडतोब उपाय करुन हा प्रश्न सोडविला. पाणीपुरवठ्याची साधने पुनर्स्थापित करुन हे काम वेळेत पूर्ण केले.

१९६० मध्ये मुंबई शहरास ६० किलोमीटर अंतरावरुन बंद जलवाहिन्याद्वारे पिण्याचे पाणी पुरविण्याची योजना वर्ल्ड बँकेच्या सहकार्याने बनविली गेली. चितळे यांच्यामुळे सिंचन कालवे, जलविद्युत प्रकल्प आणि नदीखालून काढलेल्या बोगद्यांचा समावेश केला. त्यामुळे जलाशय आणि मुंबई शहर यादरम्यानच्या सुमारे २५० वर्ग किलोमीटर क्षेत्रातील लोक आणि शेते यांना अनुक्रमे पिण्याकरिता आणि सिंचनासाठी पाणी मिळू लागले आहे.

१९९० मध्ये राष्टीय जल महामंडळाची निर्मिती झाली. राष्टीय जल नियोजनव्यूव्ह यांना गती देण्यास ते अग्रभागी होते. गंगा ॲक्शन प्लॅन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गंगा जल शुद्धीकरण प्रकल्पाचे ते संस्थापक आणि संघटक राहिले. जानेवारी १९९३ मध्ये चितळे यांची नियुक्ती आंतरराष्टीय सिंचन आणि जलनिस्सारण आयोगाचे सहकार्यवाह म्हणून झाली. जागतिक पाणी परिषदेच्या विकासात आणि जागतिक जलसहभागात ते सामील होते. दक्षिण आशियातील स्थानिक राष्टीय जलसहभागास त्यांनी चालना दिली. राज्य जल आणि सिंचन आयोगाने त्यांच्या अध्यक्षतेखाली जलविकासाच्या तीस वर्षाची पार्श्वभूमी प्रकाशित केली. जलसंपदा अभियांत्रिकीमध्ये त्यांनी विशेष कामगिरी केली. मोठी धरणे बांधण्याबाबतच्या प्रश्नावर त्यांनी काम केले. जलविषयक जागृतीचे कार्य केले. सध्या त्यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन समिती स्थापन झाली असून, महाराष्टातील सिंचन गैरव्यवहारासंबंधीची ही समिती चौकशी करणार आहे.

**समीर इनामदार**


# पक्षीतज्ज्ञ प्रकाश गोळे


प्रकाश गोळे

प्रकाश गोळे सर्वांनाच परिचित आहेत ते पक्षीतज्ज्ञ म्हणून. पण त्यांनी पर्यावरणाच्या क्षेत्रात अनेक पथदर्शी प्रकल्प आणि समग्र पर्यावरणाचा अभ्यासक्रम चालू करुन देशाला शाश्वत विकास कसा करता येईल, हे दाखवून दिले आहे. वाणिज्य शाखेचे पदवीधर आणि अर्थतज्ज्ञ म्हणून ते गणले जातात. सुरुवातीला त्यांनी गोखले इन्स्टिट्यूटमध्ये सहायक संशोधक म्हणून १९६२–१९६७ पर्यंत काम पाहिले. पानशेत धरण फुटल्यानंतर निर्माण झालेल्या प्रश्नासंबंधी त्यांनी डॉ. सुलभा ब्रह्मेंसोबत पानशेत परिसरातील विस्थापन व इतर घटकांवर झालेले परिणाम याबाबत सर्वेक्षण करुन पुस्तक प्रसिद्ध केले. महाविद्यालयीन शिक्षण घेताना त्यांना गिर्यारोहण आणि पक्षी निरीक्षणाचा छंद होता. त्यांचवेळेस त्यांची डॉ. सलीम अली यांची भेट झाली. नुसते पक्षीनिरीक्षण न करता डॉ. अली यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी लडाखमध्ये दुर्मिळ पक्षी तिबेटिअन क्रेन काळ्या मानेचा क्रौंच या पक्ष्यावर संशोधन सुरू केले. १९८०, ८३, ९२ तसेच भुतान, अरुणाचल प्रदेश यामध्ये १९८१, ८८, ९४ मध्ये मोहिमा राबविल्या. त्याचबरोबर बारहेहेड गूज या पक्ष्याचा अभ्यास केला. १९७२ ते १९८८ या काळात त्यांनी औद्योगिक कारखानाही चालविला. जगाच्या इतिहासावर विस्तारणारी क्षितीजे, मानवतेची मंदिरे व प्रमत्त मानव अशी तीन पुस्तके लिहिली. त्यांचा लेखक म्हणून हा प्रवास आजही सुरू आहे. विश्व प्राकृतिक निधी–भारत यांची पुणे येथे शाखा सुरु केली. बंडगार्डनजवळील नदीच्या किनारी त्यांनी पक्षी अभयारण्याची निर्मिती केली. त्यांनी इकॉलॉजी या विषयाचा अभ्यास सुरु केला. यासाठी १९८२ साली त्यांनी इकॉलॉजीकल सोसायटीची स्थापना केली. केंद्र सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाच्या त्यांनी अनेक प्रकल्प हाती घेतले. पुण्याच्या मुठा नदीच्या किनाऱ्यांचा पर्यावरणीय दृष्टीने विकास आराखडा तयार केला. महाबळेश्वर, पाचगणीसारख्या थंड हवेच्या ठिकाणी पर्यावरणीय विकास कसा करावया याबाबत त्यांचे योगदान महत्वाचे आहे. पानशेत धरणामुळे विस्थापित झालेल्यांसाठी पानशेत वन पुनरुज्जीवन आणि जयमयभूमी विकास हा पथदर्शी प्रकल्प हाती घेतला. मोठ्या जलाशयाचे व्यवस्थापन, भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यासाठी व्यवस्थापन आराखडा, सारस क्रौंच सर्वेक्षण, उत्तर भारतातील जलमयभूमींचे (वेटलँडस्) सर्वेक्षण असे अनेक प्रकल्प राबविले. वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. श्री. द. महाजन यांच्याबरोबर सिंचन विभागातील अभियंत्यांसाठी पर्यावरणीय जल व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा घेतल्या. त्यांनी पाच इंग्रजी पुस्तके व १२ मराठी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पक्षी, निसर्ग संवर्धन, शाश्वत विकास, पर्याय जलनीती, सामाजिक–पर्यावरणीय संशोधन अशा विविध विषयांवर त्यांनी लिखाण केले आहे. इकॉलॉजीकल सोसायटीच्या जर्नल ऑफ इकॉलॉजीकल सोसायटीचे ते संस्थापक, संपादक आहेत.

**सुहास सापटणेकर**

# वनस्पतीतज्ज्ञ श्री. द. महाजन


श्री. द. महाजन

दुसऱ्यांना ज्ञान देण्याची तळमळ, शारीरिक व मानसिक क्षमता आणि नवनवीन माहिती जाणून घेण्याची जिज्ञासा ज्यांच्याकडे पाहिल्यानंतर मिळते ते ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ व पर्यावरणशास्त्रतज्ज्ञ प्रा. श्री. द. महाजन. पुण्यातच महाजन यांचे शालेय शिक्षण झाले. नू. म. वि. प्रशाला, फर्ग्युसन महाविद्यालय, स. प. महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठात त्यांचे उर्वरित शिक्षण झाले. बी. एससी. वनस्पतीशास्त्र आणि एम. एससी. मध्ये त्यांचा विशेष अभ्यास सपुष्प वनस्पती आणि वनस्पती वर्गीकरणशास्त्र या विषयात झाला. मराठी साहित्य, हिंदी, संस्कृत, चित्रकला आणि हस्ताक्षर विषयांमध्ये त्यांनी प्राविण्य मिळविले. सुरुवातीच्या काळात प्रा. महाजन यांनी भारतीय वनस्पती सर्वेक्षण विभाग आणि पुणे विद्यापीठ वनस्पतीशास्त्र विभागात संशोधन सहायक आणि पदव्युत्तर अध्यापक म्हणून काही काळ काम केले. भारतातील मोठ्या भूभागामध्ये जंगल भ्रमंती करुन अनेक वेळा जंगलातच मुक्काम ठोकून मुलभूत संशोधनाचे कार्य केले. असे सर्वेक्षण प्रथमच होत असल्याने त्यांना खूप बारकाईने अभ्यास करावा लागला. १९६३ ते १९९३ अशी ३० वर्षेकोल्हापूरच्या गोखले महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख आणि जीवशास्त्र विभागप्रमुख या पदावर त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. शिवाजी विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठात ते मानद प्राध्यापक होते. भारतातील सर्व प्रकारच्या जंगलाचा त्यांनी अभ्यास केला. ४०० पेक्षा जास्त लेख, १७ शोधनिबंध आणि ५ पुस्तके लिहिली. वनस्पतीशास्त्र, वनस्पतीवर्गीकरण, पर्यावरणशास्त्र, औषधी वनस्पती, जैव विविधता, जंगल परिसंस्था या विषयावर विद्यापीठ, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग, केंद्रशासनासाठी पर्यावरणीय सर्वेक्षण आणि प्रकल्प अहवाल तयार करण्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. कोल्हापूरला असताना त्यांनी निसर्गमित्र कोल्हापूर ही संस्था स्थापन केली. त्याचप्रमाणे गोव्यातील निसर्गप्रेमींसाठी निसर्गमित्र गोवा ही संस्था स्थापन केली. ॲग्री हॉर्टिकल्चर सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया या संस्थेचे ते एक विश्वस्त आहेत. महाराष्ट्र वृक्षसंवर्धिनी या संस्थेचे ते अध्यक्ष आहेत. इकॉलॉजीकल सोसायटीमध्ये सुरुवातीपासूनच त्यांचे अध्यापनाचे काम सुरू आहे. अध्यापन, मार्गदर्शन, व्याख्याने, वृक्षपरिचय कार्यक्रम, परिसंवाद, वर्तमानपत्रे, प्रकाशन या मार्गाने त्यांचे पर्यावरणाचे काम सुरू आहे. त्यांना जयश्री गुणे पुरस्कार, धन्वंतरी पुरस्कार, निसर्ग सेवक पुरस्कार, मारुती चितमपल्ली निसर्गमित्र पुरस्कार, डॉ. बा. द. वर्तक वनमित्र पुरस्कार आणि इतर पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. सदैव पर्यावरणाची चिंता करणारा माणूस म्हणून ते ओळखले जातात. मानवकेंद्रीय जीवनशैलीला त्यांचा विरोध आहे. जीवनशैलीत बदल केल्या तरच पर्यावरण वाचणार आहे आणि पर्यावरण वाचणार असल्याचे ते सांगतात.

**नंदू कुलकर्णी**

**TERRE Policy Centre**
7, Hemdatta Apartments, 38 Mrutyunjay Colony Kothrud, Pune - 411029
Pandit Ajgaokar Scheme, Khandobacha Mal, Bhugaon, Pune - 411042

For feedback, suggestions and contributions contact us at
**Terrepolicycentre@gmail.com**
Www.terrepolicycentre.org

Editor **NewsleTERRE:**
Vinetaa Apte
(President, TERRE)

**DECLARATION:** TERRE Policy Centre is a non-profit organization and this NewsleTERRE is a purely informative and non-commercial activity of TERRE Policy Centre. The source of information is always credited, where applicable.